# पाठ 14

## पुस्तिका 13

### ज्या व्यक्तींना सवलती, परवाने किंवा प्राधिकारपत्रे दिलेली आहेत अशा व्यक्तींचा तपशील

पाठ 14

पुस्तिका 13

# सवलती, परवाने व मंजूर केलेल्या अधिका-यांचा स्वीकार करण्याचा तपशील

प्राधिकरणाने मान्य केलेले अधिकार वा परवाने, सवलती यांच्याशी निगडीत माहितीशी हे प्रकरण संबंधित आहे. अनेक संघटना किंवा खाती, सवलती/परवाने किंवा अधिकार यांचा अंतर्भाव असलेले कार्यक्रम किंवा योजना राबवितात. तरीही, इमारत प्रस्ताव खाते या बाबी संपूणर्णपणे दृष्टीसमोर ठेवत नसले तरी इमारत प्रस्ताव खात्याकडून, समक्ष अधिका-यांच्या मंजुरी प्राप्त करुन विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतुदीनुसार विकास परवानगी करिता आवश्यक अधिमूल्याची आकारणी करुन भूखंड विकासाचा अंतर्भाव असणा-या काही परवानग्या दिल्या जातात. त्याबाबतची माहिती खाली दिल्याप्रमाणे आहे.

1) योजनेचे नांव

खरे तर या खात्यामार्फत एकही कार्यक्रम किंवा योजना राबविण्यात येत नाही. तरीही, इमारत प्रस्ताव खात्याकडून मंजूर केल्या जाणा-या परवानग्याबाबतची माहिती खाली दिली आहे.

अ) 1966 च्या महाप्रादेशिक नगर रचना अधिनियम कलम क्र. 44/69 व मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम क्र. 337 अंतर्गत इमारत बांधकामाच्या मनसुब्याबाबत आयुक्तांना सूचना देऊन विकास परवानगी.

ब) 1888 च्या मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम क्र.342 अंतर्गत इमारतीमध्ये वाढीव बांधकाम किंवा वापर करणा-यामध्ये बदल करण्याच्या मनसुब्याबाबत आयुक्तांना सूचना देऊन विकास परवानगी.

क) 1888 च्या मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम क्र.302 अंतर्गत खाजगी रस्ते व इमारतींकरिता जमिनीचा अभिन्यास करण्याच्या मनसुब्याबाबत आयुक्तांना देऊन विकास परवानगी.

2) उद्देश

1967 व 2034 ची विकास नियंत्रण नियमावली आणि मसुदा विकास नियंत्रण नियमावली 1989 च्या सागरी किनारा नियंत्रण क्षेत्राच्या तरतुदीच्या अनुषंगाने वर नमूद केलेल्या परवानग्या.

मालकाने विनंती केल्यानंतर विभागाच्या मंजूर झालेल्या सुधारित विकास आराखडयांशी अनुरुप असणा-या आणि 2034 च्या विकास नियंत्रण नोंदणीनुसार संपूर्ण विभागाच्या अधिक चांगल्या नियोजन व अंमलबजावणीकरिता अशा परवानग्या दिल्या जातात.

**3) ठरवून दिलेले लक्ष्य**

मालक/अर्जदाराकडून प्राप्त झालेल्या विनंतीनुसार अशा परवानग्या गुणवत्तेनुसार दिल्या जातात.

4) पात्रता

मालक किंवा त्यांचा मुखत्यार नामधारक किंवा अधिकृत स्वाक्षरीकरिता हे अनुज्ञाप्तीधारक भूमापक किंवा वास्तुशास्त्रज्ञ यांच्यामार्फत अर्ज करु शकतात.

**5) पात्रतेकरिता नियम**

परवानगी मिळविण्यिरिता पात्रतेचे असे काही नियम नाहीत.

वर नमूद केलेल्या पात्रतेच्या नियमातून ज्या व्यक्ती योग्य ठरतात त्या अर्ज करु शकतात.

**6) पूर्वावश्यकता**

वर नमूद केलेल्या विविध प्रकारच्या परवानग्या मिळण्याकरिता पूर्वावश्यकता विविरण पत्र 1 मध्ये वेगळी जोडली आहे.

**7) सवलती/परवाने/अधिकार यांकरिता कालमर्यादा**

अर्जाची छाननी करुन मंजुरी/नामंजुरी अर्जदाराला कळविण्यात येते.

**8) अर्जाचे शुल्क**

विविरण 2 मधील शुल्क अनुसूचीप्रमाणे शुल्क आकारणी करण्यात येते.

**9) अर्जाचा नमुना**

महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम कलम 44/69 व 1888 च्या मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम क्र.337, 342, 302 अन्वये देण्यात येणा-या सूचनेच्या अर्जाचे नमुनेही विवरण पत्र 3 मध्ये जोडले आहेत.

**10) जोडपत्रांची यादी**

अ) विवरण पत्र 1 – म्हणजेच विविध परवानग्या मिळण्याकरिता पूर्वावश्यकता.

ब) विवरण पत्र 2 – नुसार शुल्क अनुसूची.

क) विवरण पत्र 3 – अर्जाचे नमुने

ड) विवरण पत्र 4 – शुल्कामधील सवलतींचा तपशील

**11) सवलतींची यादी**

अ) विकास नियंत्रण नोंदणी 37 च्या तरतुदीनुसार येथे चटई क्षेत्र निर्देशांकातील वाढ आकर्षित केली जात नाही अशा विकास नियंत्रण नियमावलीच्या करारविनिष्ट तरतुदीबाबतच्या सवलती.

ब) विकास नियंत्रण नोंदणी 6(ब) नुसार आवश्यक अधिमुल्यांची आकारणी करुन स्वेच्छाधिन अधिकारांची आवश्यकता असणा-या सवलती.

क) महसुलाबाबच्या सवलती.